# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन कक्ष)**

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय -** **कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत.**

**वाचावे -**
1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005
2. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम (1) 43
3. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग यांची आधिसुचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5 दि.14/03/2020
5. इकडील आदेश क्र.आव्यमपु/कार्या 19अ/187,189,198/2020 दि.14/03/2020 व दि. 16/03/2020
6. शासन अधिसूचना क्रमांक डीएमयु/2020/प्र.क्र.92/डीआयएसएम-1 दिनांक 25मार्च 2020

| क्र. आव्यमपु/कार्या 19अ/२६१/2020 | **आदेश** | अहमदनगर दि. ३१/03/2020 |
|---|---|---|

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक 5 चे आदेशान्वये कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी अहमदनगर जिल्हयातील सर्व सरकारी शाळा व खाजगी शाळा, तसेच महाविद्यालय व आयुक्त व्यवसाय, प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, अंगणवाड्या, कोचिंग क्लासेस, साथ रोख प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार दिनांक 31/03/2020 पर्यंत बंद ठेवण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले होते.

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक 6 च्या अधिसुचने अन्वये महाराष्ट्रातील लॉकडाऊन हे दिनांक 14 एप्रिल 2020 चे मध्यरात्री पर्यंत लागु करण्यात आलेले आहे.

**त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी अहमदनगर जिल्हयातील सर्व सरकारी शाळा, खाजगी शाळा तसेच महाविद्यालय व आयुक्त व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, अंगणवाड्या, कोचिंग क्लासेस हे साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक 14/04/2020 (मध्यरात्री) पर्यंत बंद ठेवणेबाबत याद्वारे आदेशीत करीत आहे.**

कोणतीही व्यक्ती / संस्था / संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लघन केल्यास भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय / कायदेशीर कार्यवाहीस पात्र असतील

जिल्हाधिकारी
अहमदनगर

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

**प्रति,**

1. जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
2. आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
3. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) --------- यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी.
4. तालुका दंडाधिकारी (सर्व) -------- यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी.
5. मुख्याधिकारी नगरपालीका / नगरपंचायत (सर्व) -------- यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी.

**प्रत -** सर्व विभाग प्रमुख, अहमदनगर जिल्हा.

**प्रत -** मा.विभागीय आयुक्त, नाशिक भाग, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर